# MIC opened at Agonda



Fr Romeo D'Silva inaugurates Manipal Information Centre at Agonda.

**PANJIM:** Manipal Hospitals Goa inaugurated its medical information centre (MIC) at Agonda. The information centre was inaugurated by Fr Romeo D'Silva, local parish priest, in the presence of Deputy Sarpanch Feny Mirand, Dr Madan Dang, Dr Vishal Bhusme and others. The MIC will be a single window for all medical information and will bring the clinical lineage closer to the people of Agonda. OPD consultation will be provided by highly reputed team of doctors from Manipal Hospitals on a monthly basis. On the occasion, Fr Romeo D'Silva appreciated the initiative of the Manipal Hospitals and extended his full support.

# मणिपाल हॉस्पिटल्स-गोवाच्या वैद्यकीय माहिती केंद्राचे आंगोदमध्ये उदघाटन

मडगांव - मणिपाल हॉस्पिटल्स-गोवाचे वैद्यकीय माहिती केंद्र आगोंद (दक्षिण गोवा किनारी भाग) येथे सुरू करण्यात आले आहे. या माहिती केंद्राचे उद्घाटन आगोंद येथील चर्चचे पॅरिश प्रिस्ट फा. रोमिओ डिसिल्वा हस्ते झाले. यावेळी आगोंदचे सरपंच श्री. फेर्नी मिरांडा, मणिपाल हॉस्पिटल्स-गोवाचे वैद्यकीय अधीक्षक अधिकारी डॉ. मदन डांग, मणिपाल हॉस्पिटल्स-गोवाचे कन्सलटंट न्युरो सर्जन डॉ. विशाल भस्मे आदी मान्यवर उपस्थित होते.

सर्व प्रकारची वैद्यकीय माहिती मिळण्यासाठी हे वैद्यकीय माहिती केंद्र एक-खिडकी सेवेप्रमाणे रुग्णांना सेवा देणार असून आगोंद व परिसरातील नागरिकांना सर्वोत्तम व दर्जेदार वैद्यकीय सुविधा उपलब्ध करण्यासाठी एक दुवा म्हणून काम करणार आहे. तसेच मणिपाल हॉस्पिटल्समध्ये अनुभवी व नामवंत डॉक्टरांच्या पथकाकडून मासिक पातळीवर अ... सेवाही या केंद्राच्या माध्यमातून उपलब्ध केली जाणार आहे.

या प्रसंगी आगोंद येथील चर्चचे पॅरिश प्रिस्ट फा. रोमिओ डिसिल्वा म्हणाले, या अनोख्या व गरजेच्या उपक्रमासाठी मी मणिपाल हॉस्पिटल्सचे आभार मानतो व या उपक्रमाला माझे पूर्ण सहकार्य मिळेल. आगोंद किनाऱ्याला भारतातील एक सर्वोत्तम किनारा म्हणून पर्यटकांनी, विशेषतः विदेशी पर्यटकांनी पसंती दिलेली आहे. यामुळे स्थानिकांसह देशी-विदेशी पर्यटकांनाही जागतिक दर्जाची वैद्यकीय सेवा उपलब्ध करण्यासाठी हे वैद्यकीय माहिती केंद्र महत्त्वाची भूमिका बजावेल असा मला विश्वास आहे.

मणिपाल हॉस्पिटल्स-गोवाचे वैद्यकीय अधीक्षक अधिकारी डॉ. मदन डांग म्हणाले, प्रत्येक भारतीयाला दर्जेदार आरोग्यसेवा उपलब्ध करण्याचा आमचा प्रयत्न असून या वैद्यकीय माहिती केंद्राच्या माध्यमातून अधिकाधिक लोकांपर्यंत आमची आरोग्यसेवा उपलब्ध करण्याचा प्रयत्न आहे. गोव्यातील महत्वाच्या ठिकाणी अशी वैद्यकीय माहिती केंद्रांचे जाळे उभा करून त्या द्वारे गोव्यातील वैद्यकीय पर्यटनाला चालना देण्याचा आमचा उद्देश आहे. गत आठवड्यात आम्ही मडगाव येथे असे माहिती केंद्र सुरू केले आहे आणि चालू वर्षामध्ये आणखी काही केंद्रे सुरू करण्याचे आमचे धोरण आहे.

डॉ. मदन यांनी दीनदयाळ सामाजिक सुरक्षा योजनेचीही माहिती देत मणिपाल हॉस्पिटल्स-गोवामध्ये या योजनेचा कसा लाभ घेता येईल याची माहिती दिली.



मणिपाल हॉस्पिटलच्या वैद्यकीय माहिती केंद्र आगोंदचे उद्घाटन करताना पॅरिश प्रिस्ट फा. रोमिओ डिसिल्वा, सोबत सरपंच फेर्नी मिरांडा, डॉ. मदन डांग, डॉ. विशाल भस्मे आदी मान्यवर.